2 0 FEB 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Meet to focus on marginalised entrepreneurs

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) will be hosting a two-day workshop on prospects and challenges before marginalised entrepreneurs.

The workshop will be on March 9 and 10 at the SUK campus.

An SUK official said, "Entrepreneurship development plays a major role in achieving self-employment and industrial development goals. Economic development is broadly dependent on successful entrepreneurship. For inclusive growth, the development of entrepreneurship is necessary.

He added, "In India, we have a long history of social and economic discrimination. In the post-Independence era, the government of India took major initiatives to develop the industrial sector. However, due to lack of educational and economic strength, the marginalized sections of society were barred from the industrial sector, though it remained to be actively involved in the industrialisation process."

According to another SUK official, the entrepreneurs from the marginalized sections of society face different challenges in the labour market. Due to gender, class and caste identity discrimination, entrepreneurs belonging to the marginalized sections always remain devoid of financial credit and social status as an entrepreneur. The seminar will address all of these major issues.



The V-C said that his visit to Oxford university was enriching

CAMPUS BUZZ

**V-C shares his experience at Oxford:** At a formal lecture in Shivaji University, Kolhapur (SUK) on Saturday, vice-chancellor Devanand Shinde shared his experience as a visiting scholar at Oxford university.

"The month-long programme under the European Union Namaste scheme upgraded my knowledge on the subject," said Shinde.

Shinde said the visit will help a lot for the betterment of the SUK.

"The Oxford University has produced more than 50 Nobel prize winners. Their discipline and the research oriented study must be applauded and we must replicate the same," he said.

He said, Oxford village has more than 100 libraries and with little time in hand, he could visit only 22 of them. The university has more than 70 lakh visitors every year.

**SUK organises lecture on competitive exam prep:** Deputy superintendent of police Satish Mane delivered a lecture at Shivaji University, Kolhapur (SUK) on Thursday.

Mane guided the students on ways they can prepare for competitive entrance examinations. Acting vice-chancellor D R More was also present at the event.

"You all must be confident, only confidence can help you win in any circumstances. There is no short-cut to success and keeping faith in oneself can do wonders in life," he said.

20 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार

## देवानंद शिंदे : व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून परतीनंतर विद्यापीठात विशेष व्याख्यान

कोल्हापूर : ऑक्सफर्ड विद्यापीठात एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात कारभार चालतो. एकूणच तेथील शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी येथे व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मिळावा, यासाठी विद्यापीठाच्या कुलगुरूंचे विशेष व्याख्यान शनिवारी राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू म्हणाले, ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे की, त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५० हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिक स्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. येथे जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो. त्यानंतर संस्था, कुटुंब आणि सरतेशेवटी 'मी' असतो. या 'मी'पणापासून मुक्ती मिळविण्याची शिकवण ऑक्सफर्डने दिल्याचे त्यांनी सांगितले. सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा यांची माहिती दिली.

यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.



ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून परत आल्यानंतर शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात शनिवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे व्याख्यान झाले.

### अब्जावधी पौंडांची उलाढाल

ऑक्सफर्डच्या स्थापनेपासूनच्या म्हणजे साधारणत: सन १०९६ पासूनच्या तेथील विविध शैक्षणिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरांची साद्यंत माहिती त्यांनी दिली. या ज्ञानपंढरीला दरवर्षी जगभरातील ७0 लाख लोक भेट देतात, ते केवळ या शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी. २२ हजार विद्यार्थी, १३ हजार कर्मचारी, १७,000 रोजगार, ४६00 व्यवसाय, आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौंडांची उलाढाल या विद्यापीठात होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### सुसज्ज ग्रंथालये

दीड लाख लोकवस्तीच्या ऑक्सफर्ड गावात सुमारे १२५ ग्रंथालये आहेत. येथील मध्यवर्ती ग्रंथालयात सुमारे एक कोटी वीस लाख ग्रंथ असून, सन १६२० पासून प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक या ठिकाणी उपलब्ध आहे. इतक्या प्रचंड संग्रहातील कोणतेही पुस्तक अवघ्या तीन मिनिटांत वाचकाला उपलब्ध करण्यात येते.

20 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऑक्सफर्डमधील संशोधन संस्कृती अनुकरणीय'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'ऑक्सफर्ड विद्यापीठ ही ज्ञानाची पंढरी असून ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे, एवढेच कार्य तिथे शतकानुशतके चालू आहे. इंग्लंडच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे केंद्र असलेल्या या ज्ञानपंढरीत संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे', असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा लाभ विद्यापीठातील शिक्षक, संशोधक, विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी कुलगुरूंचे विशेष व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार चालतो. एकूणच तेथील शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे. संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे की, त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५०हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिक स्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. ऑक्सफर्डमध्ये आणि एकूणच



डॉ. देवानंद शिंदे

इंग्लंडमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे येथे जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो, त्यानंतर संस्था, कुटुंब आणि सरतेशेवटी 'मी' असतो. या 'मी' पणापासून मुक्ती मिळविण्याची शिकवण ऑक्सफर्डने दिल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा यांची रंजक माहिती दिली. परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव आदी उपस्थित होते. बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी स्वागत केले. श्रीमती नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

20 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑक्सफर्डच्या ज्ञानपंढरीत जाऊन ज्ञानमय झालो

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

ऑक्सफर्ड विद्यापीठ ही ज्ञानाची पंढरी असून ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे, एवढेच कार्य तिथे शतकानुशतके चालू आहे. इंग्लंडच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे केंद्र असलेल्या या ज्ञानपंढरीत एक महिना राहून मी ज्ञानमय झालो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींना मिळावा, यासाठी विद्यापीठाच्या कॉलोक्वियममध्ये कुलगुरूंचे विशेष व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ: शिंदे म्हणाले, एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार चालतो. एकूणच तेथील शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे. संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे की, त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५० हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिक स्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. ऑक्सफर्डमध्ये आणि एकूणच इंग्लंडमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे येथे जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो, त्यानंतर संस्था, कुटुंब आणि सरतेशेवटी 'मी' असतो. या 'मी'पणापासून मुक्ती मिळविण्याची शिकवण ऑक्सफर्डने दिल्याचे त्यांनी सांगितले.



ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्रा. मार्क मलोनी यांच्या संशोधक टीमसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

कुलगुरूंनी ऑक्सफर्डच्या स्थापनेपासूनच्या तेथील विविध शैक्षणिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरांची साद्यंत माहिती दिली. या ज्ञानपंढरीला दरवर्षी जगभरातील ७० लाख लोक भेट देतात, ते केवळ या शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी. २२ हजार विद्यार्थी, १३ हजार कर्मचारी, १७,००० रोजगार, ४६०० व्यवसाय आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौंडांची उलाढाल या विद्यापीठात होत असल्याचे त्यांनी सांगितले.

येथील समृद्ध ग्रंथालये पाहून आपण सर्वाधिक प्रभावित झाल्याचे सांगताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दीड लाख लोकवस्तीच्या ऑक्सफर्ड गावात सुमारे १२५ ग्रंथालये आहेत. जगातले सर्वात मोठे ग्रंथभांडार येथे एकवटले आहे. जमिनीच्या वर जितकी इमारत दिसते, तितकेच ग्रंथागार जमिनीच्या खालीही असून भूमिगतरीत्या ही ग्रंथालये एकमेकांशी जोडलेली आहेत. येथील मध्यवर्ती ग्रंथालयात सुमारे एक कोटी वीस लाख ग्रंथ असून सन १६२० पासून प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक या ठिकाणी उपलब्ध आहे. इतक्या प्रचंड संग्रहातील कोणतेही पुस्तक अवघ्या तीन मिनिटांत वाचकाला उपलब्ध करण्यात येते. या भेटीदरम्यान आपण केवळ २२ ग्रंथालयांना भेट देऊ शकलो, असेही त्यांनी सांगितले.

सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा यांची माहिती दिली. बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात तंत्रज्ञान संशोधन परिषद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभाग, दि इन्स्टिट्यूटशन ऑफ इंजिनीअर्स, कोल्हापूर लोकल सेंटर आणि नवी दिल्ली येथील आयएसटीई यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील आंतरशाखील संशोधन' परिषदेस सुरुवात झाली. भाषा भवन येथे एनसीआयटीइटी पी. पी. भास्कर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख प्रा. डॉ जयदीप बागी होते. शेल इराक पेट्रोलियम डेव्हलपमेंटचे विजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

इन्स्ट्रो टेक्निकल सर्व्हिसेसचे इंजिनीअर सॅम. एस यांनी इंटरडिसीप्लीनरीचे महत्त्व विषद करताना आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करता असताना वेगळ्या विचारसरणीचे सादरीकराणामध्ये आंतरशाखीय शिक्षणाचे महत्त्व विषद केले. डॉ. जयदीप बागी यांनी संशोधन कार्यक्षम होताना परिणामकारक असणे जास्त गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. उद्घाटन समारंभास कोल्हापूर लोकल सेंटरचे सचिव अजय देशपांडे, श्रीकांत भोसले, समन्वयक डॉ. ए. के. साहू उपस्थित होते.

20 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अहिल्याबाईंचे कर्तृत्व असामान्य'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'अहिल्याबाई होळकर म्हटले की एक देशभक्त, हातामध्ये शिवपिंड घेतलेली धर्मपरायण महिलाच समोर येते. परंतु, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कर्तृत्व धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नव्हते. मल्हारराव होळकरांची अत्यंत तेजस्वी बुद्धीमान आणि पराक्रमी सून असलेल्या अहिल्यादेवींच्या भालाफेकीतील कौशल्याचे टिपू सुलतानानेही वर्णन केलेले आढळते. मध्ययुगीन भारतातली ती एक युद्धकुशल, स्वतंत्रतावादी, कायदेतज्ज्ञ, रसिक-गुणग्राहक, उदयोगांचे महत्त्व समजणारी अशी असामान्य स्त्री होती', असे होळकरांच्या इतिहासाचे अभ्यासक संजय सोनवणी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' या व्याख्यानामध्ये ते बोलत होते.



संजय सोनवणी

सोनवणी म्हणाले, 'मध्ययुगीन कालखंडात स्त्रीयांचे जीवन रूढी - परंपराच्या चौकटीमध्ये बांधले गेलेले होते. स्त्रियांचे नखदेखील कुणाला दिसू नये इतके त्यांना 'पडदानशीन' केले गेलेले होते. पण त्याच काळात परंपरेची बंधने झुगारून देणारी आणि प्रसंगी सनातन्यांचा रोष ओढवून घेणारी अहिल्यादेवीही आपल्याला दिसते. जी खरे तर स्वत: एका वंचित समाजातली स्त्री. परंतु केवळ आत्मविश्वास आणि धडाडीच्या जोरावर अहिल्यादेवींनी स्वत:ला मिळालेल्या संधीचे सोने केले.'

'आपल्या राज्यात विधवांना दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार देणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे स्वतंत्र सैनिक प्रशिक्षण केंद्र काढणे व स्त्रियांची बटालियन स्थापन करणे किंवा महिला विणकरांना प्रोत्साहन देणे आणि एका अर्थाने वस्त्रोद्योग व्यवसायाचा पाया घालणे यासारखी त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेली कामे ही त्यांची दूरदृष्टी आणि कर्तृत्व याची साक्ष देतात. वंचित समाजात जन्माला येऊनही, वंचिततेवर मात करून वंचित समुहांसाठी कार्य केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांवर आजही अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही याची खंतही सोनवणी यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. चांगदेव बंडगर, रावसाहेब पुजारी, दशरथ पारेकर, अमोल पांढरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी किशोर खिलारे, शरद पाटील, श्रीधर साळोखे यांचे सहकार्य लाभले. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी प्रास्ताविक ले. प्रा. अविनाश भाले यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. निलिशा देसाई यांनी आभार मानले.

20 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सकाळ'तर्फे २७ पासून 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी'

## अभिनेता राहुल बोस, रमेश बाबू यांच्यासह शिलेदारांशी संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : अनंत अडचणींवर मात करून यशोलौकिकाचे शिलेदार ठरलेल्या जगप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधण्याची पर्वणी यंदाही सोमवार (ता. २७)पासून कोल्हापूरकरांना लाभणार आहे. सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने सलग सात दिवस 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' हा अनोखा कार्यक्रम रंगणार आहे.

दरम्यान, आपल्या आजवरच्या वाटचालीतील विविध अनुभवांची शिदोरी ते या निमित्ताने सर्वांसमोर रिती करतीलच; त्याशिवाय प्रत्येकातील नवचेतना जागवताना आपापल्या क्षेत्रात नेटाने पुढे जाण्यासाठीची ऊर्जाही देतील. शिवाजी विद्यापीठात ५ मार्चपर्यंत दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत हा संवाद होईल. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असेल.

'सकाळ'ने गेल्या दोन वर्षांपासून या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला. दोन वर्षांत बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथाकार सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेता अतुल कुलकर्णी, भारत विकास ग्रुप- बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, विठ्ठल कामत, 'डिजिटल डिक्शनरीकार' म्हणून जगभरात ओळख असलेले सुनील खांडबहाले, 'सुपर थर्टी'चे संस्थापक आणि गणितज्ज्ञ आनंद कुमार, ज्ञानेश्वर मुळे, प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर, भारतातील पहिली वाईन उद्योजिका अचला जोशी, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र पटेल, नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, जागतिक कीर्तीचे चित्रकार सुभाष अवचट, कुशल संघटक प्रदीप लोखंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, ग्लोबल वेलनेस ॲम्बॅसिडर रेखा चौधरी, दिग्दर्शक अभिनय देव यांच्याशी दिलखुलास संवाद साधण्याची संधी मिळाली होती.

यंदाही अशाच नामांकित वक्त्यांची प्रभावळ लाभली असून, पहिल्या दिवशी प्रसिद्ध अभिनेता राहुल बोस पहिले पुष्प गुंफतील. स्वतःचा नाभिक व्यवसाय सांभाळत टूर्स अँड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय नेटाने उभा करीत दोनशेहून अधिक कारचे मालक झालेले बंगळूरचे रमेश बाबू, फ्लेम युनिव्हर्सिटीचे पराग शहा, आईने ज्या शेतात मजुरी केली तेच शेत विकत घेणारे दास ऑफशोअरचे अशोक खाडे आदींशी संवाद साधता येणार आहे. चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करू या. २७ फेब्रुवारी ते ५ मार्चची सायंकाळ नवप्रेरणादायी करू या...!

### विनामूल्य प्रवेश

**शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात ५ मार्चपर्यंत दररोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत हा उपक्रम होईल. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असेल. कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था केली जाणार आहे.**



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2017
लोकमत

## विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिवपुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच यावेळी प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आदी उपस्थित होते.

20 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार

## देवानंद शिंदे : व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून परतीनंतर विद्यापीठात विशेष व्याख्यान



ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करुन परत आल्यानंतर शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात शनिवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे व्याख्यान झाले.

**कोल्हापूर** : ऑक्सफर्ड विद्यापीठात एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात कारभार चालतो. एकूणच तेथील शिस्त आणि संशोधन-अध्यापन संस्कृती अत्यंत अनुकरणीय आहे, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी येथे व्यक्त केली.

कुलगुरु डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करुन नुकतेच परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मिळावा, यासाठी विद्यापीठाच्या कुलगुरुंचे विशेष व्याख्यान शनिवारी राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरु म्हणाले, ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन आणि अध्यापनाची तिथे इतकी अप्रतिम सांगड घातली गेली आहे की, त्यामुळेच या विद्यापीठातून आजपर्यंत ५० हून अधिक नोबेल विजेते आणि जागतिक स्तरावर गौरविले गेलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. येथे जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो. त्यानंतर संस्था, कुटुंब आणि सरतेशेवटी 'मी' असतो. या 'मी'पणापासून मुक्ती मिळविण्याची शिकवण ऑक्सफर्डने दिल्याचे त्यांनी सांगितले. सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा यांची माहिती दिली.

यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### सुसज्ज ग्रंथालये

दीड लाख लोकवस्तीच्या ऑक्सफर्ड गावात सुमारे १२५ ग्रंथालये आहेत. येथील मध्यवर्ती ग्रंथालयात सुमारे एक कोटी वीस लाख ग्रंथ असून, सन १६२० पासून प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक या ठिकाणी उपलब्ध आहे. इतक्या प्रचंड संग्रहातील कोणतेही पुस्तक अवघ्या तीन मिनिटांत वाचकाला उपलब्ध करण्यात येते.

### अब्जावधी पौंडांची उलाढाल

ऑक्सफर्डच्या स्थापनेपासूनच्या म्हणजे साधारणत: सन १०९६ पासूनच्या तेथील विविध शैक्षणिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरांची साद्यंत माहिती त्यांनी दिली. या ज्ञानपंढरीला दरवर्षी जगभरातील ७० लाख लोक भेट देतात, ते केवळ या शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी. २२ हजार विद्यार्थी; १३ हजार कर्मचारी, १७,००० रोजगार, ४६०० व्यवसाय, आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौंडांची उलाढाल या विद्यापीठात होत असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

फास्ट न्यूज

## मराठी कादंबरीवर राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** हुपरी येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयात २७ व २८ फेब्रुवारी रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्राचे उदघाटन ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक रंगनाथ पठारे यांचे यावेळी बीजभाषण होणार आहे. पहिल्या सत्रात हैद्राबाद विद्यापीठातील प्रा. डॉ. माया पंडित या १९८० नंतरच्या मराठी व इंग्रजी कादंबरीतील विचार प्रवाह या विषयावर मार्गदर्शन करणार आहते. चर्चासत्राचा समारोप किशोर बेडकिहाळ यांच्या विचारांने होणार आहे. चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. संजय साठे यांनी केले आहे.

कोल्हापूर TIMES OF INDIA



# शिवोत्सव...
## आठवणीतील ठेवा!

कोल्हापुरातील आदरातिथ्य, रूचकर कोल्हापुरी जेवण आणि आल्हाददायक वातावरण यामुळे शिवोत्सवामध्ये सहभागी झालेले कलाकार आणि त्यांचे मार्गदर्शकही भारावले. कोल्हापुरात शिवोत्सवानिमित्त यायला मिळाले हे कायमपणे स्मरणात राहील, अशा भावना खास युवा महोत्सवासाठी देशभरातून आलेल्या कॉलेज तरुणाईने व्यक्त केल्या.



**भारतभूषण गिरी**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि अभिनय कौशल्याला संधी मिळावी, राष्ट्रीय एकात्मता अखंडित राहावी व सांस्कृतिक देवाण-घेवाण व्हावी यासाठी राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सव दरवर्षी देशातील एका विद्यापीठात आयोजित केला जातो. या पार्श्वभूमीवर नुकताच शिवाजी विद्यापीठात ३२ वा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव (शिवोत्सव) आयोजित केला होता. शिवोत्सवासाठी देशातील ७७ विद्यापीठांचे सुमारे ३०० विविध संघ सहभागी झाले होते. सुमारे दीड हजार विद्यार्थी कलाकारांमुळे आणि त्याला उत्स्फूर्तपणे दाद देणाऱ्या 'कलापूर'च्या रसिक प्रेक्षकांमुळे गेल्या आठवड्यात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. शिट्ट्या आणि टाळ्या वाजवून जितक्या आनंदाने रसिक कलाकारांना दाद देत होते, तितक्याच प्रतिसादात कलाकार जीव तोडून कला सादर करत होते.

शिवोत्सवात वेस्टर्न ग्रुप गायन, लाइट व्होकल सोलो साँग, क्लासिकल व्होकल साँग, गझल गायन, क्लासिकल व्होकल साँग अॅण्ड डान्स याचबरोबर मणिपुरी, ओडिसी, कथक, भरतनाट्यम्, आदी नृत्य प्रकार सादर करताना कलाकारांचा कस लागला. एकांकिकेंद्वारे उत्कृष्ट अभिनयाचे सादरीकरणही कलाकारांनी केले. लघुनाटिकेच्या माध्यमातून सामाजिक संदर्भ, बदलते राजकारण आणि संगीताचा परिणाम नेमकेपणाने सादर करत कलाकारांनी प्रेक्षकांना पोटभरून हसायला लावले.

रंगाची अमर्याद उधळण करत कुंचल्याच्या सहाय्याने कॅनव्हासची दुनिया समर्थपणे पेलणाऱ्या मनस्वी कलाकारांचे दर्शन युवा महोत्सवातील चित्रकला स्पर्धेत झाले. पारंपरिक विषयाला अनेक ठिपक्यांच्या सहाय्याने जोडलेल्या रांगोळीमध्ये रंगाची मुक्त उधळण केली. या रांगोळ्यांमधून भारतीय परंपरेचे दर्शन घडत होते. इतकेच नव्हे तर पंजाबच्या लवली युनिव्हर्सिटीने टाकाऊ बाटल्यांपासून तयार केलेला भोवरा समाजातील समानतेचे दर्शन घडवत होता. एका बाटलीवर शंभर-दोनशे बाटल्यांचा बॅलन्स साधून त्यांनी सामाजिक स्तर कसा साधला जाऊ शकतो याचा परिपाक दिला. राजस्थानच्या केंद्रीय विश्व विद्यालयाने ग्रीन सोसायटी, क्लीन सोसायटीचा संदेश देत प्रदूषण टाळून पर्यावरणाचा समतोल साधण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नैसर्गिक स्रोतांची आवश्यकता त्यांनी त्रिमितीय कलाकृतीतून दाखवून दिली.

एकापेक्षा एक कलाकार आणि त्यांचे मार्गदर्शक यांना मात्र कोल्हापूर आणि कोल्हापूरविषयी आदर वाटला. बहुतांश कलाकारांनी आणि त्यांच्या मार्गदर्शकांनी कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ खूप आवडल्याचे सांगितले. येथील लोक मदत करणारे, माणुसकी जपणारे, कलासक्त असल्याचे त्यांनी नमूद केले. काहींनी येथील हिरवाई, निसर्गरम्य परिसर, शिवाजी विद्यापीठाची लक्षवेधक इमारत आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा हे सारेच नवी उमेद देणारे असल्याचे सांगितले.

